ePaper

वर्ष - 9 । अंक -98 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । सोमवार, दि. 1 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मतदानापूर्वी गेम फिरला, ओबीसी समाजाचा थेट राष्ट्रवादी शरद पवार गटाला पाठिंबा!



### आतील पानांत


- १७ धावांनी जिंकली भारतीय टीम!
- विराटच्या शतकावर रोहितची प्रतिक्रिया!
- तामिळनाडूमध्ये दोन बसेसची टक्कर
- निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय!


## मध्य महाराष्ट्रही गारठला
### पारा 9.8°C वर; रविवारी पुणेकरांची थंडीतील 'मॉर्निंग मजा'

# अबब..! पुण्यात कडाक्याची थंडी!

## सलग दुसरा दिवस तापमानात मोठी घसरण; पुण्यात पारा 10°C खाली

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**शहरात गेल्या आठवडाभरात तापमान झपाट्याने वाढत असताना सलग दुसऱ्या दिवशी थंडीत मोठी वाढ नोंदवली गेली. शनिवारी रात्रीपासून गारवा चांगलाच वाढला आणि रविवारी सकाळी पुणेकरांना अगदी दिल्ली-हरियाणातील हिवाळ्याची आठवण करून देणारा थंडीचा कडक झटका जाणवला. शहरातील किमान तापमान 9.8 अंश सेल्सिअस तर कमाल तापमान 27.9 अंश सेल्सिअस नोंदले गेले. महिनाभरात दुसऱ्यांदा तापमानाचा पारा 10 अंशांच्या खाली गेल्याने पुणेकरांनी सुट्टीच्या रविवारी हिवाळ्याचा 'फुल-ऑन' आनंद घेतला.**



रविवारी सकाळी शहरभरच्या रस्त्यांवर वाफाळणाऱ्या चहाच्या टपऱ्यांवर मोठी गर्दी दिसत होती. अनेकांनी सकाळी पायी फिरणे, सायकलिंग, ट्रेकिंगसाठी बाहेर पडत ताज्या हवेतून गारठ्याचा आनंद लुटला.

**उत्तरेकडून जोरदार थंड वाऱ्यांची भर: पुणे आणि मध्य महाराष्ट्रात थंडीचे आगमन**

महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांपासून उत्तर दिशा आणि मध्य प्रदेशकडून येणाऱ्या कोरड्या, थंड वाऱ्यांना अनुकूल वातावरण मिळत आहे. त्याचा थेट परिणाम पुणे, नाशिक, नगर, कोल्हापूर, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांवर जाणवत आहे.

**भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार—**

रात्रीच्या तापमानात एकाच दिवशी तब्बल 5 अंशांनी घट झाली.

पहाटेच्या वेळी शहरात बोचरी थंडी जाणवत होती. सकाळी 9 वाजेपर्यंत हवेत गारठा कायम होता.

दुपारी उन्हाची तीव्रता कमी, त्यामुळे दिवसभर वातावरण आल्हाददायक. संध्याकाळनंतर पुन्हा थंड वारा वाहू लागल्याने गारठा वाढला. उपनगरांमध्ये, कात्रज, कोथरूड, पाषाण, चिखली, तळेगाव, पिंपरी-चिंचवड भागात मध्यवर्ती पुण्यापेक्षा अधिक गारठा जाणवत होता.

**सोप्या भाषेत हवामानाचा अंदाज: पुढील दोन दिवस थंडी कायम. हवामान विभागाने अंदाज वर्तवला आहे की— आकाश पूर्णपणे निरभ्र राहील.

रात्रीचे तापमान अजून खाली घसरण्याची शक्यता आहे.

किमान तापमानात 2 ते 3 अंशांची आणखी घट होऊ शकते.

थंडीची लाट पुणेकरांना पुढील आठवड्यापर्यंत जाणवेल. यामुळे हिवाळ्याची 'खरी' मजा येत्या काही दिवसांत आणखी वाढण्याची चिन्हे आहेत.

**महाराष्ट्राचा थंडी नकाशा: कुठे किती पारा घसरला?**

राज्यातील अनेक शहरांत तापमानात मोठी घसरण झाली. काही ठिकाणी हवामान 'हाडे गोठवणारी' थंडी घेऊन आले.

**थंडी वाढण्यामागील वैज्ञानिक कारणे**

कोरडे उत्तर वारे येत असल्याने तापमान घसरते.

आकाश निरभ्र असल्याने रात्री उष्णता जमिनीतून त्वरीत बाहेर जाते.

हवेतील आर्द्रतेमध्ये घट, त्यामुळे वातावरण आणखी थंड.

गेल्या आठवड्यातील उबदार स्थितीनंतर अचानक बदल.

**आरोग्यासाठी सूचना**

**थंडी वाढल्याने काही खबरदारी घ्यावी:**

गरम कपडे वापरा

रात्री किंवा पहाटे बाहेर पडताना काळजी घ्या, गरम पाणी प्या, लहान मुले, वृद्ध यांची विशेष काळजी, दमा, घशाचे आजार, सर्दी-खोकला असणाऱ्यांनी सावध राहावे

**एकूण चित्र:** पुण्यात हिवाळ्याला जोरदार सुरुवात

पुण्यात सध्या जाणवत असलेला गारठा हा या हंगामातील सर्वात मोठा आहे.

आगामी दोन दिवसांत तापमान आणखी घसरेल, असा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे.

### महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांचे तापमान (°C):

**जळगाव (नीचांकी)** – 9°C
**हवेली (पुणे ग्रामीण)** – 7.8°C
**शिवाजीनगर (पुणे शहर)** – 9.8°C
**बारामती** – 9.6°C
**पाषाण** – 9.4°C
**तळेगाव** – 10.1°C
**आंबेगाव** – 10.7°C
**गिरीवन** – 15.3°C
**रत्नागिरी** (उच्चांकी) – 34°C



### महाबळेश्वरही थंडावले, मात्र पुणे थंड!

पुणेकरांचे आवडते पर्यटनस्थळ महाबळेश्वरमध्येही तापमानात घट नोंदली.
कमाल तापमान: 25.1°C
किमान तापमान: 11.4°C
विशेष म्हणजे महाबळेश्वरपेक्षा पुण्यात काही भागात याहून जास्त गारठा जाणवत होता. पुणेकरांचा रविवारी 'विंटर मूड': स्वेटर्स, मफलर्स, कॉफी, चहा... सुट्टीचा दिवस असल्याने सकाळपासून पुणेकरांनी थंड हवेत फिरण्याचा आनंद घेतला.
अनेकांनी स्वेटर्स, जॅकेट्स, मफलर्स काढून घातले.
संध्याकाळी बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी मोठी गर्दी.
चहा, कॉफी, हॉट सूपच्या स्टॉल्सवर मोठ्या रांगा दिसल्या.
उद्याने, फिरायची ठिकाणे, हिल-टॉप्स, टेकड्या गर्दीने फुलल्या.

कोटींची थकबाकी

साडेअडीच हजार कोटींची थकबाकी प्रलंबित

# अभय योजनेला स्थायीची मंजुरी

## ‘अभय योजनेत’ सवलतीचा निर्णय

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**विशेष प्रतिनिधी मिळकतकर महापालिकेने थकविणाऱ्यांना पुन्हा एकदा ‘अभय’ दिले आहे. यापूर्वी अभय योजनेचा लाभ घेणाऱ्या थकबाकीदारांना सध्या सुरु असलेल्या ‘अभय योजनेत’ सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. या निर्णयावर आता सजग नागरीक मंचने टीका केली, मोठ्या थकबाकीदारांकडून वसुली करण्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असून, अशी सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित राहीली आहे, असा आरोप करण्यात येत आहे.**




महापालिकेने मिळकतकर थकबाकीदारांसाठी अभय योजना जाहीर केली होती. या थकबाकीदारांना दंडावरच्या रक्कमेत ७५ टक्के सवलत दिली जात आहे. आता जाहीर केलेल्या अभय योजनेचा लाभपूर्वीच्या योजनेचा लाभ घेतल्यानंतरही एक लाख ४० हजार मिळकतधारक पुन्हा थकबाकीदार झाले आहेत. ही योजना जाहीर करताना पूर्वीच्या लाभधारकांना यंदा योजनेचा लाभ घेता येणार नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले होते. परंतु आम्हालाही या योजनेचा लाभमिळावा अशी मागणी थकबाकीदारांकडून केली जात होतो. त्यामुळे तसा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता. त्याला शुक्रवारी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सजग नागरीक मंचकडून विरोध सदर योजना राबविण्याच्या प्रस्तावाला सजग नागरीक मंचने विरोध केला होता. यापूर्वी अभय योजनेचा लाभ घेतलेल्या थकबाकीदारांनीच मोठ्या प्रमाणावर मिळकत कराची थकबाकी ठेवली आहे. त्यामुळे त्यांना नवीन अभय योजनेतून वगळावे अशी मागणी केली होती. त्यानुसार प्रशासनाने निर्णय घेतला होता. परंतू सध्या सुरु असलेल्या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचा दावा करीत महापालिकेने आता सर्वच थकबाकीदारांना योजनेचा लाभ देण्याचे ठरविले आहे. त्यावर सजग नागरीक मंचचे विवेक वेलणकर यांनी टिका केली आहे. महापालिका प्रशासनाच्या मनमानी कारभारावर राजकीय पक्ष मौन कधी सोडणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.देण्याचे ठरविले आहे. त्यावर सजग नागरीक मंचचे विवेक वेलणकर यांनी टिका केली आहे. महापालिका प्रशासनाच्या मनमानी कारभारावर राजकीय पक्ष मौन कधी सोडणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. वेलणकर यांनी माहिती अधिकार दिनात १ कोटी रुपयांच्या पेक्षा जास्त मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्तांची माहिती मागितली होती. या माहितीनुसार १ कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता कराची थकबाकी असणारे फक्त १,७४६ थकबाकीदार असून, त्यांच्याकडे ५१८२ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे दिसून येत आहे. यापैकी ९४ केसेस विविध कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. ज्यामध्ये अडकलेली रक्कम ९८८ कोटी रुपये आहे. ज्यात फक्त दोन केसेस मध्ये अडकलेली रक्कम ५६५ कोटी रुपयांची होती. याशिवाय मोबाईल टॉवररशी संबंधित १०६१ केसेस असून, ज्यात अडकलेली रक्कम २४२७ कोटी रुपये होती. या केसेस वर्षानुवर्षे हायकोर्टात प्रलंबित असून त्यांचा निपटारा जलद गतीने करुन घेण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे.महापालिकेने मिळकतकर थकबाकीदारांसाठी अभय योजना जाहीर केली होती. या थकबाकीदारांना दंडावरच्या रक्कमेत ७५ टक्के सवलत दिली जात आहे.पुन्हा थकबाकीदार झाले आहेत. ही योजना जाहीर करताना पूर्वीच्या लाभधारकांना यंदा योजनेचा लाभ घेता येणार नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले होते. योजनेचा लाभमिळावा अशी मागणी थकबाकीदारांकडून केली जात होती.

### माहिती अधिकारात उघड

सजग नागरीक मंचने विरोध केला होता. यापूर्वी अभय योजनेचा लाभ घेतलेल्या थकबाकीदारांनीच मोठ्या प्रमाणावर मिळकत कराची थकबाकी ठेवली आहे. त्यामुळे त्यांना नवीन अभय योजनेतून वगळावे अशी मागणी केली होती. त्यानुसार प्रशासनाने निर्णय घेतला होता. परंतू सध्या सुरु असलेल्या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचा दावा करीत महापालिकेने आता सर्वच थकबाकीदारांना योजनेचा लाभ देण्याचे ठरविले आहे.

# द्राक्ष उत्पादक शेतकरी संकटात

## उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे केली मोठी मागणी

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंबेगाव तालुक्यातील द्राक्ष उत्पादकांनी जिल्हा बँकेच्या वतीने सहकारी सोसायटीमार्फत करोडो रुपयांचे पीक कर्ज आणि दिर्घ मुदतीचे कर्ज घेतले आहे. अतिवृष्टीमुळे या हंगामात तालुक्यातील सुमारे ७० टक्के द्राक्ष बागांना घड निर्मिती झाली नाही. त्यामुळे यंदा द्राक्षांचा हंगाम वाया गेल्याने द्राक्ष उत्पादक शेतकरी आर्थिक विवंचनेत आहेत. द्राक्ष उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाने दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज माफ करावे.**



पीक कर्ज मार्च अखेर वसूल न करता एक वर्षाची मुदतवाढ मिळावी, तसेच नवीन द्राक्ष बागा उभारणीसाठी पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी तालुक्यातील द्राक्ष उत्पादकांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

आंबेगाव तालुक्यात जवळजवळ ५०० एकर क्षेत्र द्राक्ष लागवड झाली आहे.

जम्बो जातीच्या द्राक्ष निर्यातीत पुणे जिल्ह्यात आंबेगाव आणि जुन्नर तालुका अग्रेसर समजला जातो. अन्य फळबागांच्या तुलनेत द्राक्ष पिकाचा खर्च हा अधिक असतो. द्राक्ष पीक वार्षिक असल्याने वर्षभर बागेच्या संगोपनासाठी खर्च करावा लागतो.

घड निर्मितीपूर्वी दोन लाख आणि घड निर्मिती झाल्यानंतर पुढील चार महिन्यांत दोन लाख रुपये असा एकरी चार लाख रुपये द्राक्ष बागेला खर्च येतो. नवीन द्राक्षबाग उभारण्यासाठी सुमारे नऊ लाख रुपये खर्च येतो. द्राक्ष निर्यातीतून पैसे मिळवून देणारे हे पीक हवामान बदलामुळे मागील काही वर्षात अडचणीत सापडले आहेतद्राक्षबागा वाचवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने द्राक्ष उत्पादकांना पॅकेज जाहीर करणे आवश्यक आहे.

### लाखो रुपये खर्चाची गुंतवणूक

त्याचबरोबर किमान जुन्या आणि दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज माफ करणे, कर्ज वसुली तूर्त थांबवणे आवश्यक असल्याची मागणी आंबेगाव तालुक्यातील कळंब येथील द्राक्ष बागायतदार संदीप डोके या शेतकऱ्याने केली आहे. दरम्यान रांजणी विविध कार्यकारी सोसायटीचे सचिव संदिप वाघ यांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकऱ्यांनी सोसायटी मार्फत करोडो रुपयांचे कर्ज घेतलेले असल्याचे सांगितले.शेतकऱ्यांना द्राक्ष बागांची उभारणी करण्यासाठी लाखो रुपये खर्चाची गुंतवणूक करावी लागते. फवारणीसाठी ट्रॅक्टरची गरज असते.

## मोबाइल ॲपच्या माध्यमातून जिओ टॅगिंग पिंपरी चिंचवडमधील शाळांची माहिती

# आता एका क्लिकवर मिळणार!

## शाळांचे जिओ टॅगिंगचे काम पूर्ण; कामकाजात येणार एकसूत्रता

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: राज्यातील शाळांच्या कामकाजात एकसूत्रता आणण्यासाठी मोबाइल ॲपच्या माध्यमातून जिओ टॅगिंग करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. यामुळे राज्यातील शाळांची माहिती एका क्लिकवर मिळत असून, जिओ टॅगिंगच्या माध्यमातून शाळांवर वॉच ठेवला जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व माध्यमांच्या शाळांचे जिओ टॅगिंगचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता शाळांची माहिती एका क्लिकवर मिळणार आहे.**



राज्यातील ग्रामीण, शहरी भागातील प्राथमिक शिक्षणाचे संस्कार केंद्र असणाऱ्या अंगणवाडी, विविध माध्यमांच्या शाळांच्या कामकाजात एकसूत्रीपणा आणण्यासाठी मोबाईल ॲपच्या माध्यमातून जिओ टॅगिंग करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व शाळा, अंगणवाडी केंद्रांना छायाचित्रांसह संबंधित माहिती नोंदवणे बंधनकारक केले होते; तसेच संबंधित शाळांनी भरलेल्या माहितीची खातरजमा करण्याची जबाबदारी शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

शासनाने महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन सेंटर या संस्थेने शालेय शिक्षण विभागातील सर्व प्रकारच्या शाळांचे भौतिक ठिकाण छायाचित्रासह टॅग करून भौगोलिकतंत्रज्ञानाद्वारे सर्व माहिती एकत्रित करण्यासाठी महा स्कूल जीआयएसफ हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲप मध्ये शाळांना त्यांचा यू-डायस कोड किंवा यु-डायस प्लसमधील संबंधित शाळांच्या मुख्याध्यापक यांनी नोंदविलेला मोबाईल क्रमांक टाकून लॉगिन करायचे आहे. त्यानंतर शाळेची यू-डायस प्लसमध्ये भरलेली माहिती या ॲप मध्ये दिसणार आहे. त्यानंतर शाळेचे जीआयएस मध्ये लोकेशनवरून शाळेचे नाव, शाळेची संपूर्ण इमारत, किचन शेड, मुलांचे व मुलींचे स्वच्छतागृह सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा असे एकूण पाच फोटो समाविष्ट करुनशाळांनी माहिती भरली आहे. सुविधांची माहिती मिळणार

> “ पिंपरी-चिंचवड शहरातील शाळाचे जिओ टॅगिंगचे काम अपूर्ण होते. पण, त्या शाळांना पाठपुरावा करुन आता सर्व शाळांचे काम पूर्ण झाले आहे. शाळांनी मान्यता घेताना दिलेली माहिती आणि ॲप मध्ये भरलेली माहिती यांची पडताळणी होवून त्यामध्ये तफावत आहे का? देखील तपासले जाणार आहे.
> –संगीता बांगर, शिक्षण अधिकारी, महानगरपालिका

### राज्याकडून आदेश

राज्यातील सर्व शाळांबाबतची संपूर्ण माहिती केंद्र शासनाच्या यू-डायस प्लस या पोर्टलवर उपलब्ध केली आहे. विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या, शाळांमध्ये उपलब्ध भौतिक सुविधा, संगणकीय सुविधा आदी शाळांबाबतच्या विविध माहितीचा यात समावेश आहे. शासनस्तरावर विविध धोरण, कार्यक्रमांची आखणी तसेच अंमलबजावणीचा आराखडा तयार करताना या माहितीचा वापर केला जाणार आहे. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन सेंटर या संस्थेसोबत करार करून माहिती गोळा करण्याचे काम दिले आहे.

### स्वतंत्र डॅशबोर्ड

यू-डायस प्लस या पोर्टलवरील शालेय शिक्षण विभागांच्या माहितीचे एकत्रीकरण केले जाईल. स्वतंत्र डॅशबोर्ड यासाठी तयार केले जाईल. तसेच महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन सेंटर या संस्थेतर्फे शालेय शिक्षण विभागातील सर्व प्रकारच्या शाळांचे भौतिक ठिकाण छायाचित्रासह टॅग करण्यात येईल. गोळा केलेली माहिती मोबाइल ॲप महास्कूल जीआयएसवरून उपलब्ध होणार आहे.

# जास्त जागा दिल्या तरच भाजपसोबत

## रामदास आठवले : पिंपरीमध्ये रिपब्लिकन पक्षाचा संकल्प मेळावा

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: महापालिका निवडणूकीत जास्त जागा दिल्या तर भाजपसोबत जायचे, नाही तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत युती करायची, असा सल्ला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पदाधिकाऱ्यांना दिला.**

### जागावाटपावरुन सल्ला; राष्ट्रवादीसोबत जाण्याचीही तयारी



पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामागील पटांगणात आरपीआय पिंपरी चिंचवड शहरच्या वतीने शनिवारी (दि. २९) विजयी संकल्प मेळावा आयोजित केला होता. त्यावेळी सभेला संबोधित करताना ते बोलत होते.

शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, महिला प्रदेशाध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब भागवत, कमल कांबळे, धम्मरत्न गायकवाड, योगेश भोसले, संस्वप्निल कसबे, सम्राट जकाते, दयानंद वाघमारे, धर्मपाल तंत्रपाल, सुंदर कांबळे, सुरेश निकाळजे उपस्थित होते. आठवले म्हणाले की, आपली युती भाजप किंवा राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्या सोबतच होणार आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी किंवा काँग्रेसबरोबर होणार नाही.

### मालक व्हा, तरुणांना सल्ला

आपल्या तरुणांनी दहा-बारा हजारांच्या नोकरीमागे न पळता, छोटा-मोठा उद्योग, धंदा सुरू करावा. अनेकांनी विविध महामंडळांकडून पैसे घेऊन मुला-मुलींची लग्ने केली. असे न करता ते पैसे उद्योगात लावले पाहिजेत. आपल्याला नोकर नाही, तर मालक व्हायचे आहे असे रामदास आठवले यावेळी म्हणाले.




# भारतात तिहेरी तलाकवर बंदी

**2017 साली सर्वोच्च न्यायालयाने त्वरित तिहेरी तलाक (तलाक-ए-बिद्दत) प्रथेवर बंदी घालून एक ऐतिहासिक निर्णय दिला. मुस्लिम महिलांच्या हक्कांसाठी लढलेल्या या लढ्यात तो एक मोठा विजय होता. पण हा लढा अजून संपलेला नाही.**

घटस्फोटाचे इतर एकतर्फी आणि न्यायबाह्य प्रकार, जसे की 'तलाक-ए-हसन', आजही अस्तित्वात आहेत आणि त्यांचा वापर केला जात आहे. पत्रकार बेनझीर हीना यांनी या प्रथेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे, ज्यामुळे मुस्लिम महिलांच्या समान हक्कांसाठी एका नव्या कायदेशीर लढाईला सुरुवात झाली आहे. 'तलाक-ए-हसन' हा घटस्फोटाचा एक प्रकार आहे, जिथे पती तीन महिन्यांच्या कालावधीत दर महिन्याला एकदा 'तलाक' शब्द उच्चारून पत्नीला घटस्फोट देतो. या तीन महिन्यांच्या काळात जर पती-पत्नी पुन्हा एकत्र राहू लागले, तर घटस्फोट रद्द होतो. पण, जर या काळात त्यांच्यात समेट झाला नाही आणि तिसऱ्या महिन्यात पतीने तिसऱ्यांदा 'तलाक' उच्चारला, तर घटस्फोट अंतिम मानला जातो. बंदी घालण्यात आलेल्या त्वरित तिहेरी तलाक (तलाक-ए-बिद्दत) प्रथेमध्ये एकाच बैठकीत तीन वेळा 'तलाक' म्हणून तात्काळ आणि अपरिवर्तनीय घटस्फोट दिला जात होता. 'तलाक-ए-हसन'ची प्रक्रिया वेगळी असली तरी, ती सुद्धा पुरुषांना एकतर्फी




घटस्फोट देण्याचा अधिकार देते, जो महिलांना उपलब्ध नाही. या नव्या कायदेशीर लढ्याच्या केंद्रस्थानी आहेत पत्रकार बेनझीर हीना. त्यांच्या पतीने हुंड्याची मागणी पूर्ण न केल्याने वकिलामार्फत 'तलाक-ए-हसन'ची नोटीस पाठवून घटस्फोटाची प्रक्रिया सुरू केल्याचा त्यांचा आरोप आहे. या घटस्फोटामुळे बेनझीर यांना अत्यंत गंभीर व्यावहारिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बेनझीर या ना धड विवाहित, ना धड घटस्फोटित अशा कायदेशीर त्रिशंकू अवस्थेत अडकल्या आहेत. त्यांच्या पतीने दुसरे लग्न केले असले तरी, बेनझीर यांना आपल्या मुलाला शाळेत प्रवेश मिळवण्यासाठीही संघर्ष करावा लागत आहे, कारण त्या आपल्या वैवाहिक स्थितीचा पुरावा देऊ शकत नाहीत. आपला हा लढा सर्वोच्च न्यायालयात नेऊन बेनझीर यांनी दाखवलेले धैर्य वाखाणण्याजोगे आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटल्याप्रमाणे, "आज आमच्यासमोर एक पत्रकार आहे, पण त्या दुर्गम भागात राहणाऱ्या, आवाज नसलेल्या महिलांचं काय?" बेनझीर आज अशाच लाखो महिलांचा आवाज बनल्या आहेत.

विक्रांत पाटील

FREE USE NEWS ARTICLE FOR PUBLICATIONS न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने 'तलाक-ए-हसन' प्रथेच्या वैधतेवर अत्यंत कठोर शब्दात प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने या प्रथेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "ही कसली प्रथा आहे? 2025 मध्ये तुम्ही याला कसे काय प्रोत्साहन देत आहात? ... स्त्रीचा सन्मान असाच राखला जातो का? एका सुसंस्कृत समाजाने अशा प्रकारच्या प्रथेला परवानगी द्यावी का?" न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, जेव्हा "अत्यंत भेदभावपूर्ण प्रथा" समाजावर मोठ्या प्रमाणावर परिणाम करतात, तेव्हा न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करून उपाययोजना करणे बंधनकारक असते. शोषणाचे आणि अन्यायाचे हत्यार? बेनझीर हीना यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा युक्तिवाद केला आहे की, ही प्रथा मनमानी, अतार्किक आणि संविधानाने दिलेल्या समानतेच्या (अनुच्छेद 14 आणि 15) आणि सन्मानाने जगण्याच्या (अनुच्छेद 21) मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करते. याचा अर्थ असा की, ही प्रथा केवळ एका महिलेला घटस्फोट देण्याची पद्धत नाही, तर ती तिला भारतीय नागरिक म्हणून मिळालेल्या समानतेच्या आणि सन्मानाने जगण्याच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवते. पतीने थेट पत्नीशी संवाद न साधता वकिलामार्फत घटस्फोटाची नोटीस पाठवण्यावर न्यायालयाने विशेष आक्षेप घेतला. न्यायालयाचा हा आक्षेप केवळ तांत्रिक नव्हता; बेनझीर यांना आपल्या मुलाच्या शाळेच्या प्रवेशासाठी स्वतःची वैवाहिक स्थिती सिद्ध करता येत नाहीये, हे वास्तव या प्रक्रियेतील क्रूर IMPERSONAL पणावर आणि स्त्रीच्या असहाय्यतेवर बोट ठेवते.या कालबाह्य धार्मिक प्रथा मुस्लिम महिलांचे शोषण करण्याचे एक साधन बनल्या आहेत.

## प्रासंगिक »

### घंटा धोक्याची !

***जागतिक गतिक स्तरावर जा होणाऱ्या प्रचंड वेगाने होणाऱ्या तापमानवाढीमुळे आणि हवामान बदलांमुळे पाण्याचे संकट गडद होत चालले आहे.***

नव्याने भर टाकणारा पटक म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. इंटरनेट कंपन्या आणि विविध संशोधन संस्थांच्या अभ्यासानुसार एआयच्या वापरामुळे वॉटर फुटप्रिंटस् धोकादायक वेगाने वाढत आहे. डिजिटल कंपन्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता चालवण्यासाठी वापरत असलेल्या सर्व्हरना थंड ठेवण्यासाठी दरवर्षी अब्जावधी गॅलन पाण्याचा वापर करावा लागत आहे. उदाहरणार्थ, चॅटजीपीटीला एक प्रश्न विचारल्यानंतर त्याचे उत्तर वापरकर्त्यांला मिळण्यासाठी साधारण अर्धा लिटर पाणी खर्च होते, अशी गणना केली जाते. त्यामुळे भविष्यकाळात पाण्याचे भयावह संकट उभे राहण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. याचाच अर्थ, कृत्रिम बुद्धिमत्ता पृथ्वीचे पाणी शोषत चालली आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, एआयचा वापर करणाऱ्या बहुतेकांना याची जाणीवसुद्धा होत नाही. आणि संगणकांच्या वाढत्या वापरामुळे मागील दोन दशकांपासून असेच अंदाज व्यक्त होत आले आहेत.

2025 च्या बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (NDA) अभूतपूर्व विजय मिळवला. 243 पैकी तब्बल 202 जागा जिंकून एनडीएने अक्षरशः त्सुनामी आणली. या प्रचंड विजयाचे शिल्पकार म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची नावे आघाडीवर असताना, पडद्यामागे एक असा रणनीतीकार होता.

# विनोद तावडेंनी बिहार कसा जिंकला?

या विजयाचा पाया रचला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हा नेता बिहारमधील कोणी स्थानिक नव्हता, तर महाराष्ट्रातील एक 'मराठी माणूस' होता - विनोद तावडे. महाराष्ट्रात एकेकाळी शक्तिशाली मंत्री असलेले आणि 2019 मध्ये पक्षाने तिकीट नाकारल्यामुळे राजकीय वनवासात गेलेले तावडे, बिहारच्या राजकारणाचे 'चाणक्य' कसे बनले, ही त्यांच्या राजकीय पुनरागमनाची एक अविश्वसनीय कहाणी आहे.बिहारच्या या विजयात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एकूणच प्रचाराला दिशा दिली आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी जमिनीवर पक्ष संघटना मजबूत केली. पण या सर्वांच्या पलीकडे जाऊन, अत्यंत शांतपणे आणि अचूकपणे रणनीतीची अंमलबजावणी करणारे 'गुप्त शिल्पकार' होते विनोद तावडे, ज्यांनी विशेषतः 'मेसेजिंग आणि सामाजिक आघाड्या बांधण्यावर' लक्ष केंद्रित केले. सप्टेंबर 2022 मध्ये जेव्हा



तावडे यांची बिहारचे प्रभारी म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक होती. नितीश कुमार यांनी नुकतीच एनडीएची साथ सोडून राजदसोबत सरकार स्थापन केले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्रातील एका नेत्याला बिहारची जबाबदारी देणे अनेकांना खटकले होते. पण तावडे यांनी या आव्हानाला संधीत बदलले. त्यांनी महाराष्ट्रातील अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि प्रमोद महाजन-गोपीनाथ मुंडे यांच्याकडून मिळालेल्या संघटनात्मक अनुभवाचा पुरेपूर वापर करत बिहारची संपूर्ण निवडणूक यंत्रणा अत्यंत बारकाईने पुन्हा उभारली. ते आठवड्यातले तीन दिवस बिहारमध्ये घालवत, स्थानिक लोकांमध्ये मिसळून भोजपुरी बोलू लागले आणि 'लिट्टी चोखा'चा आस्वाद घेऊ लागले. या सखोल समरसतेमुळेच ते एका बाहेरच्या नेत्याच्या भूमिकेतून बाहेर पडून बिहारच्या राजकारणाचे सूत्रधार बनू शकले.विनोद तावडे यांच्या रणनीतीचा केंद्रबिंदू होता बिहारच्या राजकारणाला जातीय समीकरणांच्या जोखडातून बाहेर काढून विकासाच्या मार्गावर आणणे. विरोधकांना वाटत होते की, भाजप पारंपरिक जातीय राजकारणच खेळेल, पण तावडे यांचे चातुर्य यातच होते की, त्यांनी जातीय समीकरणांचा इतका सखोल अभ्यास केला की, ते त्याला अचूकपणे निष्प्रभ करू शकले. त्यांनी 1952 आणि 1957 च्या जुन्या निवडणूक निकालांचा आणि दस्ताऐवजांचा अभ्यास करून जातीय निष्ठा कशा बदलत गेल्या हे समजून घेतले. पण हा अभ्यास जातीय राजकारण करण्यासाठी नव्हता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

आघाडीच्या गणिताला धक्का

## मशाल चिन्हावर लढणारे ७ उमेदवार भाजपच्या गोटात

# ऐनवेळी 'तिसऱ्या आघाडी'चा यू-टर्न!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बदलापूर नगरपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत महाविकास आघाडीला ऐनवेळी मोठा राजकीय धक्का बसला आहे. स्थानिक गट असलेल्या 'तिसरी आघाडी' या संस्थेने आपला पाठिंबा काढून थेट भाजपला (BJP) समर्थन जाहीर केले आहे.**

### राजकीय वातावरण तापले




सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, या संस्थेचे सात उमेदवार महाविकास आघाडीतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या चिन्हावर (मशाल) निवडणूक लढवत असतानाही त्यांनी भाजपला पाठिंबा दिला आहे. तिसरी आघाडी या संस्थेकडे स्वतंत्र चिन्ह नसल्याने त्यांनी निवडणुकीसाठी ठाकरे गटाच्या 'मशाल' चिन्हाचा वापर केला होता. ऐन निवडणुकीत त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता, मात्र आता त्यांनी अचानक भाजपला पाठिंबा दिल्याने बदलापूरचे राजकीय वातावरण तापले आहे. तिसरी आघाडीच्या या भूमिकेमुळे महाविकास आघाडीच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे, तर भाजपच्या प्रचार यंत्रणेला यामुळे अधिक बळ मिळाले आहे. हा पाठिंबा कोणत्या अटी-शर्तींवर देण्यात आला आहे आणि या सात उमेदवारांचा प्रचारात प्रत्यक्ष सहभाग कसा असेल, याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे. या घडामोडीमुळे बदलापूर नगरपरिषद निवडणुकीचे निकाल अनपेक्षित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाची यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार त्यांच्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सदस्यपदांसाठी आणि थेट अध्यक्षपदासाठी सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदानाची वेळ २ डिसेंबरला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत असणार आहे. मतमोजणी ३ डिसेंबरला सकाळी १० वाजता सुरू होणार आहे.या निवडणुकांसाठी पुरेशी ईव्हीएम (EVM) मशीनची व्यवस्था करण्यात आली असून,

### कधी मतदान, कधी मतमोजणी?

या घडामोडीमुळे बदलापूर नगरपरिषद निवडणुकीचे निकाल अनपेक्षित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाची यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार त्यांच्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

त्यामध्ये १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची उपलब्धता आहे.बदलापूर नगरपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत (BADLAPUR MUNICIPAL COUNCIL ELECTIONS) महाविकास आघाडीला (MAHA VIKAS AGHADI – MVA) ऐनवेळी मोठा राजकीय धक्का बसला आहे. स्थानिक गट असलेल्या 'तिसरी आघाडी' या संस्थेने आपला पाठिंबा काढून थेट भाजपला (BJP) समर्थन जाहीर केले आहे.सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, या संस्थेचे सात उमेदवार महाविकास आघाडीतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या चिन्हावर (मशाल) निवडणूक लढवत असतानाही त्यांनी भाजपला पाठिंबा दिला आहे. तिसरी आघाडी या संस्थेकडे स्वतंत्र चिन्ह नसल्याने त्यांनी निवडणुकीसाठी ठाकरे गटाच्या 'मशाल' चिन्हाचा वापर केला होता. ऐन निवडणुकीत त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता, मात्र आता त्यांनी अचानक भाजपला पाठिंबा दिल्याने बदलापूरचे राजकीय वातावरण तापले आहे. तिसरी आघाडीच्या या भूमिकेमुळे महाविकास आघाडीच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे, तर भाजपच्या प्रचार यंत्रणेला यामुळे अधिक बळ मिळाले आहे. हा पाठिंबा कोणत्या अटी-शर्तींवर देण्यात आला आहे आणि या सात उमेदवारांचा प्रचारात प्रत्यक्ष सहभाग कसा असेल.

# धाराशिव नगरपालिकेच्या निवडणुकीत रंगत!

## भाजपचा 'वचननामा' प्रसिद्ध, खासदार ओमराजेंची टीका

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील नगरपालिकेच्या निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात असून निवडणुकांसाठी स्वतः व्यक्तिशः राणाजगजितसिंह पाटील, आमदारपुत्र मल्हार पाटील यांच्यासह त्यांच्या माता जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चना पाटील यांनी शहरातील प्रत्येक प्रभाग पिंजून काढत आहेत.**

प्रत्येक प्रभागातील उमेदवारांसह नगराध्यक्षपदाच्या उमेदवार नेहा काकडे यांना सोबत घेत पदयात्रा काढल्या जात आहेत. घरोघरी जात प्रचाराचा वेग वाढवला आहे. त्यास लोकांचाही प्रतिसाद मिळत असून प्रचारात रंगत वाढली आहे.

मागील काही दिवसांपासून धाराशिव शहरातील भीमनगर, बौद्धनगर, खिरणीमळा, नेहरू चौक, काळा मारुती चौक, निंबाळकर गल्ली, माऊली चौक, दर्गा रोड, अण्णाभाऊ साठे चौक, आंबेडकर नगर, खाजानगर, गणेश नगर, समर्थ नगर, बार्शीनाका, तांबरी विभाग, बँक कॉलनी, पोस्ट कॉलनी, शाहू नगर आदींसह शहरातील सर्व भागात प्रचारासाठी कॉर्नर सभा आणि पदयात्रांत आघाडी घेतली आहे. यामुळे विरोधी पक्षांनाही प्रचारात आपली यंत्रणा ताकतीने उतरविणे भाग पडले असून



त्यांच्याही प्रभागनिहाय पदयात्रा होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.दरम्यान भाजपाने वचननामा नावाने आपला २८ कलमी जाहीरनामा प्रसिद्ध केला असून शहरातील रस्ते, गटारी, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन आणि सुरक्षा व्यवस्था यांसह अन्य विषयांच्या आगामी पांच वर्षात करावयाच्या कामाचे यात वचन देण्यात आले आहे. २४ कोटींचा निधी खर्चून शहरात ठिकठिकाणी चार बगीचे, उद्याने निर्माण करण्यात येणार आहेत. शहरातील मोक्यांच्या

### पाटील कुटुंबाचा झंझावात

शहरातील पारधीपीडी हा परिसर काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र तिथे मोठ्या प्रमाणात भाजपाला जनसमर्थन मिळत असल्याचे दिसून येत असून काल निघालेल्या रॅलीत महिला, वृद्धांसह मोठ्याप्रमाणात पारधी समाज बांधव मल्हार पाटील यांच्या नेतृत्वात निघालेल्या रॅलीत सहभागी झाले होते.

ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात येणार आहेत. ५०० खाटांच्या मंजूर रुग्णालयाची निर्मिती करण्यात येणार आहे. नगरपालिकांच्या शाळांची गुणवत्ता वाढ करण्यासाठी सर्व शाळांना आधुनिक करण्यात येणार आहे. शहरातील रस्ते आणि गटारींचे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे. महिलांसाठी अत्याधुनिक व्यायामशाळेसह पदवीधर विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका निर्माण करण्याचे यात वचन देण्यात आले आहे. दरम्यान राणा पाटील आणि परिवाराचा भाजपासाठी प्रचाराचा झंझावात पाहता अनेक संघटना आणि अपक्ष उमेदवार त्यांना पाठिंबा देत असून वेगवेगळ्या विभागातील भाजपात दाखल होत आहेत.

## तामिळनाडू हादरले! कराईकुडीजवळ दोन सरकारी बसेसची भीषण धडक

# तामिळनाडूमध्ये दोन बसेसची टक्कर

### ११ जणांचा जागीच मृत्यू



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**रविवारी तामिळनाडूतील कराईकुडीजवळ दोन सरकारी बसेसची समोरासमोर भीषण टक्कर झाली. या दुर्घटनेत अकरा जणांचा जागीच मृत्यू झाला असून, २० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. एका पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात कराईकुडीपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर झाला. मृतांमध्ये आठ महिला, दोन पुरुष आणि एका मुलाचा समावेश आहे.**

अपघातात जखमी झालेल्या २० हून अधिक जणांना तातडीने उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, दोन्ही बसेसची धडक समोरासमोर झाली. धडक इतकी तीव्र होती की दोन्ही बसेसचा पुढचा भाग पूर्णपणे खराब झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, तपास सुरू आहे.पोलिसांनी सांगितले की, एक बस कराईकुडीकडे जात होती, तर दुसरी मदुराईहून येत होती. टक्कर झाल्यानंतर प्रवासी बसमध्ये अडकले होते. स्थानिकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढण्यात आले आणि त्यानंतर जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अनेक जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त आहे.तामिळनाडूमध्ये एका आठवड्यातील ही दुसरी मोठी बस टक्कर आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला तेनकासी (TENKASI) जिल्ह्यात दोन बसची टक्कर झाली होती, ज्यात सहा जणांचा मृत्यू झाला होता आणि ५० हून अधिक जखमी झाले होते. दोन्ही बसमध्ये किमान ५५ प्रवासी होते.

जखमींपैकी अनेकांना गंभीर दुखापतींसह रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, ज्यात त्यांचे हात, पाय आणि डोके फ्रॅक्चर झाले आहेत. तेनकासी येथे हा अपघात तेव्हा घडला, जेव्हा मदुराईहून सेनकोट्टईला जाणारी एक खासगी बस तेनकासीहून कोविलपट्टीला जाणाऱ्या दुसऱ्या बसला धडकली. या टक्करीत दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले होते.रविवारी तामिळनाडूतील कराईकुडीजवळ दोन सरकारी बसेसची समोरासमोर भीषण टक्कर झाली. या दुर्घटनेत अकरा जणांचा जागीच मृत्यू झाला असून, २० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. एका पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात कराईकुडीपासून सुमारे

### जखमींना रुग्णालयात हलवले

अपघातात जखमी झालेल्या २० हून अधिक जणांना तातडीने उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, दोन्ही बसेसची धडक समोरासमोर झाली. धडक इतकी तीव्र होती की दोन्ही बसेसचा पुढचा भाग पूर्णपणे खराब झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, तपास सुरू आहे.

१५ किलोमीटर अंतरावर झाला. मृतांमध्ये आठ महिला, दोन पुरुष आणि एका मुलाचा समावेश आहे.

अधिकाऱ्याने सांगितले की, दोन्ही बसेसची धडक समोरासमोर झाली. धडक इतकी तीव्र होती की दोन्ही बसेसचा पुढचा भाग पूर्णपणे खराब झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, तपास सुरू आहे. पोलिसांनी सांगितले की, एक बस कराईकुडीकडे जात होती, तर दुसरी मदुराईहून येत होती. टक्कर झाल्यानंतर प्रवासी बसमध्ये अडकले होते.

स्थानिकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढण्यात आले आणि त्यानंतर जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अनेक जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त आहे.तामिळनाडूमध्ये एका आठवड्यातील ही दुसरी मोठी बस टक्कर आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला तेनकासी (TENKASI) जिल्ह्यात दोन बसची टक्कर झाली होती.

ज्यात सहा जणांचा मृत्यू झाला होता आणि ५० हून अधिक जखमी झाले होते. दोन्ही बसमध्ये किमान ५५ प्रवासी होते. जखमींपैकी अनेकांना गंभीर दुखापतींसह रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, ज्यात त्यांचे हात, पाय आणि डोके फ्रॅक्चर झाले आहेत. तेनकासी येथे हा अपघात तेव्हा घडला, जेव्हा मदुराईहून सेनकोट्टईला जाणारी एक खासगी बस तेनकासीहून कोविलपट्टीला जाणाऱ्या दुसऱ्या बसला धडकली. या टक्करीत दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले होते.

# निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय!

## SIR साठी बारा राज्यांना दिली मुदतवाढ..काय आहे नवीन तारीख?


। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय निवडणूक आयोगाने विशेष सघन पुनरावृत्ती अर्थात SIR बाबत मोठा निर्णय घेतला आहे. १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सध्या सुरू असलेल्या विशेष सघन पुनरावृत्ती (SIR) प्रक्रियेची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने (ELECTION COMMISSION) या प्रक्रियेसाठी अंतिम मुदत ही सात दिवसांनी वाढवली आहे.**

निवडणूक आयोगाने त्यांचा मागील आदेश रद्द करत एक नवीन वेळापत्रक जारी केले आहे. त्यानुसार, गणना, बूथची पुनर्रचना, मसुदा यादीचे प्रकाशन आणि दावे आणि हरकती आता सुधारित तारखांनुसार केल्या जातील. ही मुदतवाढ त्या राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी आहे जिथे SIR आधीच सुरू आहे.

यामध्ये अंदमान आणि निकोबार बेटे, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुदुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल यांचा समावेश आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मते, मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि सुलभ करण्यासाठी ही मुदतवाढ



आवश्यक होती. पूर्वी, एसआयआर प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख ४ डिसेंबर होती, म्हणजेच फक्त चार दिवस शिल्लक होते. आता, सात दिवसांच्या मुदतवाढीसह, ही मुदत ११ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.मतदार यादीत नावे जोडू इच्छिणाऱ्या, वगळू इच्छिणाऱ्या किंवा दुरुस्त करू इच्छिणाऱ्यांना अधिक वेळ मिळेल. ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर (BLO) आणि ERO स्तरावर फील्ड पडताळणी आणि सुनावणीच्या

### याचा अर्थ काय?

१२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सध्या सुरू असलेल्या विशेष सघन पुनरावृत्ती (SIR) प्रक्रियेची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने (ELECTION COMMISSION) या प्रक्रियेसाठी अंतिम मुदत ही सात दिवसांनी वाढवली आहे. निवडणूक आयोगाने त्यांचा मागील आदेश रद्द करत एक नवीन वेळापत्रक जारी केले आहे.

वेळा देखील वाढविण्यात आल्या आहेत. निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट अंतिम मतदार यादी अधिक अचूकतेने तयार करणे आहे. त्यामुळे आता मसुदा प्रकाशनाची तारीख ९ डिसेंबर २०२५ वरून १६ डिसेंबर २०२५ करण्यात आली आहे. दावे आणि हरकतींची तारीख ९ डिसेंबर २०२५ वरून ८ जानेवारी २०२६ वरून १६ डिसेंबर २०२५ वरून १५ जानेवारी २०२६ करण्यात आली आहे. मूळतः ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारी अंतिम यादी प्रकाशन आता १४ फेब्रुवारी २०२६ रोजी होईल. ही संपूर्ण प्रक्रिया एका आठवड्याने पुढे ढकलण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने विशेष सघन पुनरावृत्ती अर्थात SIR बाबत मोठा निर्णय घेतला आहे.

# सूरजच्या लग्नाला येऊ शकली नाही 'ही' खास व्यक्ती

बिग बॉस मराठी सीझन 5 चा विजेता सूरज चव्हाणचा 29 नोव्हेंबरला लग्नसोहळा मोठ्या थाटात पार पडला. पुण्यातील सासवड येथील माऊली गार्डन हॉलमध्ये त्याच्या लग्नसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या लग्नसोहळ्यासाठी अनेक लोकांनी हजेरी लावली होती. पण या सगळ्यात सुरजची सर्वात जवळची व्यक्ती गैरहजर होती. 'कोकण हर्टेड गर्ल' म्हणून ओळखली जाणारी अंकिता वालावलकर अलीकडेच भावाच्या—सूरजच्या लग्नाला गैरहजर राहिल्याने अनेकांची उत्सुकता वाढली होती. सूरजचं पहिलं केळवण मात्र अंकितानेच प्रेमाने केलं होतं आणि तेव्हाच तिने आपल्या भावाच्या लग्नाची पहिली झलक सर्वांसोबत शेअर केली होती. सूरजची पत्नी संजना नेमकी कोण आहे हे सुद्धा प्रेक्षकांनी अंकिताच्या व्हिडिओमधूनच पहिल्यांदा पाहिलं.अंकिताने त्या वेळीच स्पष्ट केलं होतं की, ती सूरजच्या लग्नकार्यात उपस्थित राहू शकणार नाही, कारण आधीच ठरलेल्या नियोजनानुसार तिला नागपूरमध्ये एका दुसऱ्या लग्नाला उपस्थित राहणं आवश्यक होतं.अंकिता लग्नाला येऊ शकणार नाही याची कल्पना तिने आधीच सुरजला दिली होती. अंकिता आता काही दिवसांनी सूरज आणि संजना यांना भेटायला जाणार आहे.जरी अंकिता प्रत्यक्ष उपस्थित राहू शकली नाही, तरीही तिच्या मनातल्या भावनांचा ओलावा सोशल मीडियावर दिसून आला.तिने सूरज आणि संजना या दोघांसाठी एक खास, गोड आणि भावूक पोस्ट शेअर करत मनापासून शुभेच्छा दिल्या. यामध्ये तिने यादोघांनाही खास सल्ला दिला आहे. सुरज आणि संजना यांच्या लग्नातील फोटो शेअर करत अंकिताने लिहिले.

# भारतीने सोशल मीडियावर फ्लॉन्ट केला बेबी बंप

कॉमेडियन आणि अभिनेत्री भारती सिंग तिच्या दुसऱ्या गरोदरपणामुळे सध्या प्रचंड चर्चेत आहे. लवकरच ती पुन्हा एकदा आई होण्यासाठी सज्ज होत असून चाहत्यांमध्येही मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.काही दिवसांपूर्वी भारतीच्या मैत्रिणींनी तिच्यासाठी एक सुंदर बेबी शॉवर आयोजित केले होते. या सरप्राईजमुळे भारती भावूक देखील झाली होती. भारतीने नुकताच तिच्या सोशल मीडियावर बेबी बंप फ्लॉन्ट करत फोटोशूट केले आहे.भारती सिंग दुसऱ्यांदा आई होणार असून तिचे कुटुंब आणि तिचे चाहते प्रचंड खुश आहेत. या फोटोशूटमध्ये तिने आकाशी रंगाचा गाऊन घातला आहे.फोटो शेअर करत तिने कॅप्शन मध्ये लिहिले,"लवकरच येत आहे 2 बेबी लिंबाचिया" असे कॅप्शन देत तिने ही पोस्ट केली आहे. या पोस्टवर अनेक कलाकरांसह चाहत्यांनी कमेंट्स केल्या आहेत.भारतीने अलीकडेच तिच्या यूट्यूब चॅनेलवर एक व्हीलॉग शेअर केला आहे ज्यामध्ये ती तिच्या मुलाला गोलाला विचारते की त्याला बहीण हवी आहे की भाऊ, ज्यावर तो उत्तर देतो, "भाऊ आणि बहीण दोघेही." भारतीने प्रत्युत्तर दिले, "हा गोल सर्वांना दिशाभूल करतो. तो मीडियालाही असे म्हणतो, ज्यामुळे त्यांना वाटते की आपल्याला जुळी मुले आहेत."दरम्यान, हर्ष भारतीला सांगतो की हे शक्य आहे. भारती म्हणते की तिचे इतक्या वेळा सोनोग्राम झाले आहेत, परंतु फक्त एकच दिसला आहे.

# चुम दरांगने मराठीत साधला संवाद



'बिग बॉस'चं १८वं पर्व संपून तीन दिवस झाले आहेत. तरीही या पर्वाची क्रेझ पाहायला मिळत आहे. 'बिग बॉस'च्या १८व्या पर्वात झळकलेले सदस्य सध्या खूप चर्चेत आहेत. सतत त्यांचे व्हिडीओ व्हायरल होतं आहेत. नुकताच चुम दरांगचा व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये अरुणाचल प्रदेशची चुम दरांग मराठीत संवाद साधताना पाहायला मिळाली विवियन डिसेना, करणवीर मेहरा, अविनाश मिश्रा, चुम दरांग, ईशा सिंह आणि रजत दलाल हे सहा सदस्य अंतिम फेरीपर्यंत पोहोचले होते. यावेळी चुम दरांग टॉप-५ पर्यंत पोहोचली. ईशा सिंहनंतर प्रेक्षकांच्या कमी मतांमुळे ती बाहेर झाली. तिच्या पाठोपाठ अविनाश मिश्रा आणि रजत दलाल एविक्ट झाला. विवियन आणि करण यांच्यामध्ये कोण 'बिग बॉस'च्या १८व्या पर्वाचा विजेता होणार याची धाकधूक प्रेक्षकांमध्ये पाहायला मिळाली. अखेर करणवीर मेहराने बाजी मारली. 'बिग बॉस'च्या १८व्या पर्वाच्या ट्रॉफीवर करणने स्वतःचं नाव कोरलं. यावेळी सलमान खानने करणचं नाव विजेता म्हणून घोषित केल्यानंतर चुम दरांग आनंदात उड्या मारताना पाहायला मिळाली. शोबाहेर आल्यानंतर करण आणि चुम सोशल मीडियावर लाइव्ह आले होते. त्यानंतर नुकतीच चुम दरांग पिवळ्या ड्रेसमध्ये दिसली.

# क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा

बॉलीवूड कपल पुलकित सम्राट आणि क्रिती खरबंदा यांचा विवाहसोहळा थाटामाटात पार पडला. पुलकित-क्रितीने मानेसरमध्ये लग्नगाठ बांधली. पुलकित-क्रितीच्या लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते. पुलकित-क्रितीच्या लग्नाला एक महिना पूर्ण झाला. या निमित्ताने दोघांनी आपल्या सोशल मीडियावर लग्नसोहळ्यातील काही क्षण शेअर केले आहेत. नवरीची मंडपात एंट्री होताच पुलकितचे अश्रूअनावर झाले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होतोय. क्रिती आणि पुलकितने या खास दिवशी एकमेकांसाठी छोटस स्पीच तयार केलं होतं. यात त्यांनी एकमेकांबद्दल खूप सुंदर गोष्टी लिहिल्या होत्या. आपल्या भावना व्यक्त करत असताना दोघांचेही डोळे पाणावले होते.सप्तपदीच्या आधी पुलकित क्रितीला भेटायला आला होता. तेव्हा "ब्राईड ओ ब्राईड" अशी हाक मारत त्याने क्रितीला बोलावलं. पुलकितच्या हाकेनंतर क्रिती बाहेर आली आणि तिने त्याला घट्ट मिठी मारली. क्रितीने याचा व्हिडीओ तिच्या अधिकृत सोशल मीडियावर शेअर केला आहे. "जेव्हा आम्ही एकमेकांना शोधलं, तेव्हा खरंतर आम्ही स्वतःला शोधलं आणि हे सर्वात सुंदर प्रकारचं प्रेम आहे. आता तर लग्नाला एक महिना झाला आहे, पण कायम आयुष्य एकत्र जगण्याची सुरुवात खूप आधीपासूनच सुरू झाली आहे."क्रितीने लग्नाचे फोटो आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केले होते. लग्नासाठी क्रितीने बेबी पिंक रंगाचा लेहेंगा निवडला होता, तर पुलकितने या खास दिवसासाठी ऑलिव्ह ग्रीन रंगाची शेरवानी परिधान केली होती.

# नीता अंबानींनी नेसली खास साडी



रिलायन्स समुहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या पत्नी नीता अंबानी कायमच त्यांच्या हटके स्टाइलमुळे चर्चेत असतात. कोणत्याही कार्यक्रमाला त्या नवनवीन भारतीय परंपरेला साजेशा अशा साड्या नेसण्यास प्राधान्य देतात. या साडीची सध्या सर्वत्र चर्चा होत असल्याचं पाहायला मिळत आहे. नीता अंबानी यांनी नेसलेली साडी सेलिब्रिटी डिझायनर तरुण ताहिलियानीच्या कलेक्शनमधली खास साडी आहे.तरुण ताहिलियानीने नीता अंबानींचे फोटो शेअर करत या साडीबद्दल स्वत: माहिती दिली आहे. ही साडी विणण्यासाठी तब्बल १९०० तास लागल्याचं या डिझायनरने पोस्टमध्ये म्हटलं आहे. तरुण ताहिलियानी सांगतो, "नीता अंबानी यांची साडी विणण्यासाठी १९०० तासांहून अधिक वेळ लागला आहे, तसेच यामध्ये फ्रेंच नॉटसह क्लासिक आरी वर्क करण्यात आलं आहे. या साडीवर नीता अंबानी यांनी मॉर्डन कॉलरचा ब्लाऊज घातला आहे. या ब्लाऊजवर एक खास ब्रोच आहे. हा मध्यभागी असलेला ब्रोच रॉयल लूक देतो." या लूकमध्ये नीता अंबानी खूपच सुंदर दिसत होत्या. सुंदर साडी, त्यावर दागिन्यांची उत्कृष्ट रचना यामुळे नीता अंबानींच्या लूकला पूर्णत्व आलं आहे. जमेवार/जामावार हा पर्शियन शब्द असून याचा अर्थ फुलांनी सजवलेला कपडा असा होतो. नावाप्रमाणेच नीता अंबानींच्या साडीवर असलेली नाजूक फुलांची डिझाइन सर्वांचं लक्ष वेधून घेते. जमेवार साड्या या प्रामुख्याने काश्मिरमध्ये विणल्या जातात. १९०० तास म्हणजेच जवळपास ८० दिवसांहून अधिक काळ काम करून ही साडी तयार करण्यात आली आहे.नीता अंबानींच्या साडीवर हेवी वर्क केल्याचं फोटोमध्ये पाहायला मिळत आहे. यावर मोत्याचे सुंदर कानातले, हातात ब्रेसलेट अन् अंगठी या लूकमध्ये त्या खूपच सुंदर दिसत आहेत. नीता अंबानींची ही साडी अन् हा रॉयल लूक सर्वांच्याच पसंतीस उतरला आहे.रिलायन्स समुहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या पत्नी नीता अंबानी कायमच त्यांच्या हटके स्टाइलमुळे चर्चेत असतात. कोणत्याही कार्यक्रमाला त्या नवनवीन भारतीय परंपरेला साजेशा अशा साड्या नेसण्यास प्राधान्य देतात. रिलायन्स समुहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या पत्नी नीता अंबानी कायमच त्यांच्या हटके स्टाइलमुळे चर्चेत असतात. कोणत्याही कार्यक्रमाला त्या नवनवीन भारतीय परंपरेला साजेशा अशा साड्या नेसण्यास प्राधान्य देतात. या साडीची सध्या सर्वत्र चर्चा होत असल्याचं पाहायला मिळत आहे.

आफ्रिकेने ३३२ धावा केल्या

## दक्षिण आफ्रिकेने दिली भारताला जबरदस्त टक्कर

# 17 धावांनी जिंकली भारतीय टीम!

## आफ्रिकेसमोर ३५० धावांचे लक्ष्य

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा १७ धावांनी पराभव केला. भारताने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर ३५० धावांचे लक्ष्य ठेवले होते, परंतु दक्षिण आफ्रिकेने ३३२ धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवने चार बळी घेतले. हर्षित राणाने तीन बळी घेतले. अर्शदीप सिंग यांनी दोन बळी घेतले. प्रसिद्ध कृष्णाने एक बळी घेतला.**



दक्षिण आफ्रिकेकडून मॅथ्यू ब्रिट्झकेने ७२ धावा केल्या, तर मार्को जानसेनने ७० धावा करून दक्षिण आफ्रिकेच्या आशा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु अखेर भारताने १० धावांनी सामना जिंकला. विराट कोहलीने १३५ धावा, केएल राहुलने ६० धावा आणि रोहित शर्माने ५७ धावा केल्या, ज्यामुळे भारताला एकूण ३४९ धावा करता आल्या. मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामना ३ डिसेंबर रोजी रायपूर येथे खेळला जाईल.भारताने दिलेल्या ३५० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला ४९.२ षटकांत ३३२ धावा करता आल्या. दक्षिण आफ्रिकेकडून मॅथ्यू ब्रेटजेने ७२ धावा आणि मार्को जॅन्सेनने ७० धावा केल्या. कॉर्बिन बॉशने ५१ चेंडूत ६७ धावा केल्या. टोनी डी जियोर्गीने ३९ आणि डेवाल्ड ब्रेव्हिसने ३७ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेच्या टॉप ३ फलंदाजांपैकी दोन फलंदाजांना खातेही उघडता आले नाही तर कर्णधार एडेन मार्कराम सात धावा काढून बाद झाला. भारताकडून फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने सर्वाधिक चार बळी घेतले तर हर्षित राणाने तीन बळी घेतले.विराट कोहलीने १३५ धावा केल्या, ज्यामध्ये ११ चौकार आणि सात षटकारांचा समावेश होता. या काळात कोहलीने १२० चेंडूंचा सामना केला. कर्णधार केएल राहुलने ५६ चेंडूत ६० धावा केल्या. राहुलने ५६ चेंडूत तीन षटकार आणि दोन चौकार मारले. रोहित शर्मा ५१ चेंडूत ५७ धावा करून बाद झाला. भारताने ५० षटकांत आठ गडी गमावून ३४९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जॅन्सेन, नांद्रे बर्गर, कॉर्बिन बॉश आणि ओटनील बार्टमन यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. याशिवाय विराट कोहलीने सचिन तेंडुलकर आणि रिकी पाँटिंग यांचा रेकॉर्डही मोडला आहे. रोहित शर्माने एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही फलंदाजाने सर्वाधिक षटकार (३५२) मारल्याबद्दल पाकिस्तानच्या शाहिद आफ्रिदीला मागे टाकले. या मालिकेपूर्वी रोहितचे ३४९ षटकार होते. १९९६ ते २०१५ दरम्यान आफ्रिदीने ३९८ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३५१ षटकार मारले. रोहितने डावाच्या १५ व्या षटकात दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज प्रेनेलन सुब्रायनच्या चेंडूवर डीप मिडविकेटवर सलग दोन षटकार मारून आफ्रिदीच्या विक्रमाशी बरोबरी केली आणि नंतर मार्को जॅन्सेनला डीप स्क्वेअर लेगवर खेचून आफ्रिदीचा कमी डावात सर्वाधिक एकदिवसीय षटकार मारण्याचा विश्वविक्रम मोडला. २००७ मध्ये पदार्पणानंतर भारतासाठी २७८ सामन्यांमधील २७० व्या डावात रोहितने ही कामगिरी केली. ६० वे एकदिवसीय अर्धशतक पूर्ण केल्यानंतर तो जॉन्सनच्या गोलंदाजीवर एलबीडब्ल्यू झाला. त्याने ५० चेंडूत ५७ धावा करताना पाच चौकार आणि तीन षटकार मारले. त्याने विराट कोहलीसोबत १०९ चेंडूत दुसऱ्या विकेटसाठी १३६ धावांची भागीदारी करून भारताला दमदार सुरुवात करून दिली.पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा १७ धावांनी पराभव केला. भारताने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर ३५० धावांचे लक्ष्य ठेवले होते, परंतु दक्षिण आफ्रिकेने ३३२ धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवने चार बळी घेतले.

## विराट कोहलीचा पराक्रम

प्रसिद्ध कृष्णाने एक बळी घेतला. दक्षिण आफ्रिकेकडून मॅथ्यू ब्रिट्झकेने ७२ धावा केल्या, तर मार्को जानसेनने ७० धावा करून दक्षिण आफ्रिकेच्या आशा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु अखेर भारताने १० धावांनी सामना जिंकला. विराट कोहलीने १३५ धावा, केएल राहुलने ६० धावा आणि रोहित शर्माने ५७ धावा केल्या, ज्यामुळे भारताला एकूण ३४९ धावा करता आल्या. मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामना ३ डिसेंबर रोजी रायपूर येथे खेळला जाईल.

# विराटच्या शतकावर रोहितची प्रतिक्रिया!

## सेलिब्रेशन करताना दिली शिवी; सोशल मीडियावर खळबळ

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**रांचीच्या मैदानावर विराट कोहलीची (VIRAT KOHLI) बॅट जोरदार तळपली. यशस्वी जयस्वाल स्वस्तात बाद झाल्यानंतर क्रिझवर आलेल्या विराटने सुरुवातीपासूनच कमालचा फॉर्म दाखवला आणि दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांची चांगलीच शाळा घेतली. कोहली आणि रोहित शर्मा (ROHIT SHARMA) यांनी मिळून दुसऱ्या विकेटसाठी १३६ धावांची उत्कृष्ट भागीदारी केली.**



रोहित शर्मा ५७ धावा काढून बाद झाला, पण विराटने आपला धडाकेबाज फॉर्म कायम ठेवत वनडे क्रिकेटमधील आपले ५२वे शतक पूर्ण केले. कोहलीच्या या शतकाचा आनंद ड्रेसिंग रूममध्ये बसलेल्या रोहितनेही खूप घेतला.

मात्र, याच सेलिब्रेशनदरम्यानचा रोहितचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यात रोहित आनंद व्यक्त करताना काही अपशब्द (शिवी) बोलताना दिसत आहे.सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये रोहित आणि इतर खेळाडू कोहलीच्या शतकाची आतुरतेने वाट पाहत असल्याचे दिसत आहेत. विराटने शतक पूर्ण करताच रोहित, अर्शदीप सिंगसह सर्व खेळाडू उभे राहून टाळ्या वाजवताना दिसतात. याच जल्लोषादरम्यान, रोहित शर्माच्या तोंडातून काही अपशब्द (CURSE WORD) बाहेर पडले, जे चुकून कॅमेऱ्यात कैद झाले.कोहली सुरुवातीपासूनच उत्कृष्ट लयीत दिसत होता आणि त्याने एकामागून एक शानदार शॉट्स मारले. विराटने ४७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. अर्धशतकानंतर त्याने आपले 'विक्राळ रूप' दाखवत १०२ चेंडूत आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ८३ वे शतक पूर्ण केले.

## एका फॉरमॅटमध्ये सर्वाधिक शतके

कोहलीने १२० चेंडूंचा सामना करत १३५ धावांची दमदार खेळी केली, ज्यात ११ चौकार आणि ७ षटकारांचा समावेश होता.रांचीत शतक झळकावून विराट कोहलीने इतिहास रचला आहे. कोहली एकाच फॉरमॅटमध्ये (वनडे) सर्वाधिक शतके (५२) ठोकणारा फलंदाज बनला आहे. यासह कोहलीने क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। सोमवार।
। दि. 1 डिसेंबर 2025।

## शिक्षण विश्व: 500 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

# एमआयटी कॉलेजतर्फे मतदान जागरूकता रॅली!

## आळंदीतील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजतर्फे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आळंदीतील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज व एमआयटी आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स ज्युनिअर कॉलेज यांनी आळंदी नगर परिषदेसोबत संयुक्तपणे 'वोटर्स जागरूकता रॅली' आयोजित केला. या मोर्चात ५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.**




रॅलीला विविध घोषवाक्यांनी रंगत आणली. विद्यार्थ्यांनी "स्वच्छ आळंदी सुंदर आळंदी", "युवाशक्ती मतदान शक्ती", "मतदान हा हक्क नाही, तर कर्तव्य आहे" अशा शक्तिशाली घोषवाक्यांनी परिसर दणदणाट केला.

ही रॅली कॉलेज कॅम्पसहून सुरू होऊन आळंदी प्रदक्षिणा रस्त्यापर्यंत वळला आणि त्यानंतर परत कॉलेज कॅम्पसवर समाप्त झाला. विद्यार्थ्यांच्या या सशक्त सहभागामुळे आळंदीतील मतदारांमध्ये जागरूकतेचा प्रसार झाला. या महत्त्वाच्या उपक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. सदाशिव कुंभार आणि प्राध्यापक अमित ताले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. तसेच, कॉलेजचे सर्व कर्मचारी सदस्य यामध्ये सक्रियपणे सहभागी झाले. या रॅलीचे आयोजन करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबद्दल जागरूकता निर्माण करणे, ही समाजाच्या प्रत्येक घटकासाठी महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. या रॅली ला मार्गदर्शन डॉ. बी बी वाफारे यांचे लाभले.

### रॅलीमुळे जनजागृती

या रॅलीचा मोठा परिणाम झाला. विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे, स्थानिक नागरिक आणि मतदारांमध्ये मतदानाची महत्त्वता समजावून सांगण्याचा एक उत्कृष्ट मार्ग सापडला आहे. रॅलीतून दिलेले संदेश, विशेषतः "मतदान हा कर्तव्य आहे" आणि "युवाशक्ती मतदान शक्ती" यांसारख्या घोषवाक्यांनी स्थानिक समाजात एक सकारात्मक बदल घडवण्याचा आधार तयार केला आहे. अशा उपक्रमामुळे लोकशाहीत प्रत्येकाचा सहभाग वाढविणे महत्त्वाचे ठरते, आणि त्याचा दीर्घकालीन प्रभाव होईल, अशी आशा आहे.

---

## डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची अभिमानास्पद कामगिरी

## शिक्षण विश्व: शिर्डी अहिल्यानगर येथे झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेतून निवड

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिर्डी अहिल्यानगर येथे 20 ते 22 नोव्हेंबर रोजी झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेतून पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एस पी पी यू विभागीय स्तरावरील स्पर्धेत डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या बुद्धिबळ संघाने उल्लेखनीय कामगिरी करत सहभाग नोंदवला**




या स्पर्धेतून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पश्चिम विभागीय अंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी सिद्धांत पितलावार (कम्प्युटर), मित भट्टड, (ईएनटीसी), तनिश गुप्ता (एआयडीएस) या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे

महाविद्यालयातील खेळाडूची पहिल्यांदाच ए आय यू वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड झाली असून हा डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगसाठी ऐतिहासिक क्षण ठरला आहे डी वाय पाटील एज्युकेशन कॉम्प्लेक्सचे ट्रस्टी तेजस पाटील यांनी संघाचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या कॅम्पस डायरेक्टर रिटायर्ड ॲडमिरल अमित विक्रम यांनी संघाच्या यशाचे कौतुक करून प्रोत्साहन दिले डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रिन्सिपल डॉ पी मालती यांनी सर्व खेळाडूंचे स्वागत करत स्पर्धेतील विजय आणि निवड हे महाविद्यालयासाठी अभिमानाचे असल्याचे सांगितले कॉलेजचे डीन ॲडमिनिस्ट्रेशन डॉ एस एस सरनोबत आणि रजिस्टर प्रशांत भालेराव यांनीही संघाचे अभिनंदन केले

शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक आबाजी माने यांनी संघाच्या यशात प्रशिक्षणाचा मोलाचा वाटा असल्याचे सांगत ही कामगिरी महाविद्यालयासाठी अभिमानाची असल्याचे नमूद केले.

## कंपनीतील एलपीजी गॅसच्या स्फोटात

# एक कामगार ठार : पाच जखमी!

### भोसरी एमआयडीसीतील अंबिका पावडर कोटिंग कंपनीमध्ये दुर्घटना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी एमआयडीसीतील अंबिका पावडर कोटिंग कंपनीमध्ये एलपीजी गॅस गळती होऊन झालेल्या स्फोटात लागलेल्या आगीत एक कामगार मृत्युमुखी पडला. तर, पाच कामगार जखमी झाले. ही दुर्घटना शनिवारी (दि. २९) दुपारी पावणेचारच्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच महापालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. तीन बंबांच्या सहाय्याने सुमारे अर्धातासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात आली. जखमींवर महापालिकेच्या वायसीएम रूग्णालयात उपचार सुरू आहेत.**




सुनील कुमार (वय २५) असे मृत्युमुखी पडलेल्या कामगाराचे नाव आहे. दाऊ कुमार (वय २४), सुड्डु जयस्वाल (वय २२), सुरज जाटो (वय २२), राहुल कुमार (वय २४), रोहित कुमार (वय २३, सर्व रा. नवीन भोसरी हॉस्पीटल शेजारी, धावडे वस्ती, भोसरी) अशी जखमी झालेल्या कमागारांची नावे आहेत. मृत आणि जखमी असे सर्व कामगार मुळचे उत्तर प्रदेशातील आहेत. भोसरी एमआयडीसी परिसरात अंबिका पावडर कोटिंग कंपनी आहे. कंपनीत पावडर कोटींग आणि बफींगचे काम चालते. त्यासाठी बॉयलरमध्ये एलपीजी गॅसचा साठा केला जातो. शनिवारी दुपारी पावणेचारच्या सुमारास कंपनीमध्ये नेहमीप्रमाणे काम सुरू असताना एलपीजी गॅसची गळती होऊन अचानक स्फोट झाला आणि आग लागली. स्फोटाचा आवाज एवढा तिव्र होता की सुमारे एक किलोमीटर अंतरापर्यंत हादरा बसला. मोठ्या आवाजाने तथा आगीच्या उंच ज्वाला तसेच धूर पसरू लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

या स्फोटाची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्र पिंपरी, नेहरूनगर उप अग्निशमन केंद्र आणि भोसरी उप अग्निशमन केंद्र येथील पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन विभागाच्या पथकाने परिस्थितीचा आढावा घेत जलदगतीने बचावकार्य सुरू केले. कंपनीतील पाच गॅस भरलेल्या सिलींडरसह आठ सिलींडर त्वरीत सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. धूर आणि उष्णतेमुळे उद्भवणारा पुढील धोका लक्षात घेऊन पथकाने परिसरातील इतर कंपन्यांमधील कामगारांना सुरक्षित बाहेर काढत परिस्थिती नियंत्रणात आणली. तीन बंबांच्या सहाय्याने सुमारे अर्धातासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. या कार्यवाहीमध्ये उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, दिलीप गायकवाड यांच्यासह ३० अग्निशामक जवान सहभागी होते. या स्फोटाचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून अग्निशमन विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून पुढील तपास सुरू आहे.

> “ स्फोटाची माहिती मिळाल्यानंतर आमचे पथक अत्यंत जलद प्रतिसाद देत काही क्षणातच घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात आढळलेल्या एलपी गॅस सिलींडरमधून गॅसची गळती मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे दुर्घटना घडली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. परिसरात अधिक प्रमाणात एलपी गॅस सिलेंडर असल्याने कारखान्यातील धूर आणि उष्णतेमुळे बचावकार्य आव्हानात्मक होते. परंतु, प्रत्येक कामगाराला सुरक्षित बाहेर काढणे आणि पुढील स्फोटाचे धोके टाळणे हेच आमच्या जवानांचे मुख्य ध्येय होते.
>
> **—ऋषिकांत चिपाडे,**
> आग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

---

## मावळात प्रचाराच्या तोफा आज थंडावणार

### आज संध्याकाळी प्रचार थांबणार; मंगळवारी होणार मतदान

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: मावळमधील नगरपंचायतीच्या निवडणुका अवघ्या काही तासांवर येऊन ठेपल्या असल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपंचायत आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मावळ तालुक्यात पुन्हा एकदा राजकीय - वातावरणाचा पारा चढताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वीच राजकीय रंगात न्हाऊन निघालेल्या शहरात आरक्षणाच्या मुद्यावर न्यायालय काय निर्णय घेते, याची - उत्सुकता होती.**



अगदी निवडणुका - पुढे ढकलल्या जातील, अशी चर्चाही जोर धरत होत्या. परिणामी - उमेदवारांच्या प्रचार तोफा काही - दिवस शांत झाल्या आणि शहरातील तापलेले वातावरण अचानक थंडावले होते. परंतु आता अखेरच्या टप्प्यात राजकीय - तापमान शिगेला पोहचले आहे. दरम्यान आज संध्याकाळी प्रचाराच्या तोफा थंडावणार असून, मंगळवारी मतदान होणार आहे.

न्यायालयाने निवडणुका - नियोजित वेळेतच होणार असल्याचा निर्णय देताच, पुन्हा एकदा संपूर्ण मावळात राजकीय रणधुमाळीची चाहूल जाणवू - लागली आहे. या निवडणुकांचे - औपचारिक वेळापत्रक घोषित होताच इच्छुक उमेदवारांनी शक्तिप्रदर्शनाला सुरुवात केली होती. अर्ज दाखल करण्यापूर्वीचनिघालेल्या रॅली, ढोल-ताशे, फटाक्यांची आतषबाजी आणि समर्थकांच्या घोषणांनी मावळातील राजकीय चित्र रंगले होते. सोशल मीडियावर व्हिडिओ, पोस्टर, रील्सचा पाऊस पडत होता.

काही उमेदवारांकडून तर जनसंपर्क मोहीम एवढी आक्रमक होती की, सकाळपासून रात्रीपर्यंत मतदारांच्या घरी जाऊन भेटीगाठी, समाजमंडळे, व्यायामशाळा, दुकाने आणि बाजारपेठेतील संवाद अशा उपक्रमांत उमेदवार दिसत होते.

महिला मतदार हा या निवडणुकांतील निर्णायक घटक मानला जात असल्याने उमेदवारांनी त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले. खेळ पैठणी स्पर्धा, स्थानिक देवदर्शन यात्रांचे आयोजन, हळदी-कुंकू कार्यक्रम, महिला मेळावे आणि स्नेहभोजन अशा उपक्रमांचे आयोजन मोठ्याप्रमाणावर करण्यात आले. जवळजवळ सर्व गटांचे नेते आणि उमेदवार या कार्यक्रमांत सक्रियतेने सहभागी होताना दिसले. यामुळे निवडणुकीची हवा अधिकच रंगतदार झाली होती.

#### येथे होणार निवडणूक

मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे नगर परिषद, लोणावळा नगर परिषद, वडगाव नगरपंचायत या शहरी भागासह ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या पाच व पंचायत समितीच्या दहा जागांसाठी निवडणुका होणार आहेत.

# PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
43 Years of Excellence in Education

## EMPOWERING YOUNG MINDS
TO CREATE A **STRONGER TOMORROW.**



## ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27

Grade Nursery to Grade XII

### WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

- 43 Years of Excellence in Education
- Advanced Robotics & Computer Labs
- Experienced and Dedicated Faculty
- Multiple Sports Grounds for All-Round Development
- Proven 100% Results in Grade X
- A Perfect Blend of Tradition and Innovation

**ENROLL NOW**

**OFFICE HOURS:**
MONDAY TO SATURDAY, 8 AM – 5 PM

**+91 9890613333 | +91 9373073077**

pgosm05@gmail.com

www.priyadarshanischoolmoshi.in


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046